माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (वाहन)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.

जा.क्र.माअधि/अपिल/००३/२०१९
दि.१८/०१/२०१९.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (वाहन), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.बी.एल.अगरवाल, ................अपिलार्थी
बी/२०५, आनंद लक्ष्मी, उत्तन रोड,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
विभागप्रमुख, वाहन विभाग

## -: विवेचन :-

श्री.बी.एल.अगरवाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख, वाहन विभाग यांचेकडे दि.१९/१२/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) मिरा भाईंदर महानगरपालिकेतील कोणकोणत्या अधिकाऱ्यांना वाहन दिलेले आहेत त्याची माहिती देण्यात यावी.
२) सदर वाहनावर एकुण (इंधन/ चालक/ दुरुस्तीसह) किती खर्च येतो.
३) सदर वाहनाच्या इंधनाचा, चालकाचा व इतर दुरुस्तीचा खर्च कोण करतो याची माहिती देण्यात यावी.
४) सदर वाहन देण्याची नियमावली काय आहे व कोणत्या कारणासाठी (उद्देश) प्रवासभत्ता देण्यात येतो याची माहिती देण्यात यावी.
५) महापालिकेतील कोणकोणत्या अधिकाऱ्यांना प्रवासभत्ता देण्यात येतो. सदर प्रवासभत्ता देण्याची नियमावली काय आहे व कोणत्या कारणासाठी (उद्देश) प्रवासभत्ता देण्यात येतो याची माहिती देण्यात यावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत अपुर्ण माहिती मिळाली असल्याने अपिलार्थी यांनी दि.१४/०१/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१८/०१/२०१९ रोजी दुपारी १२.५५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/००३/२०१९ दि.१५/०१/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.१९/१२/२०१८ रोजीच्या पत्रानुसार अपुर्ण माहिती मिळालेली आहे.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) अपिलार्थी अर्जदार यांनी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख, वाहन विभाग यांनी माहिती दिल्याचे मान्य केल्याने सदरचे अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (वाहन)
O/C मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.बी.एल.अगरवाल, श्री कालाभैरव उपासना मंडळ,
बी/२०५, आनंद लक्ष्मी, उत्तन रोड,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
विभागप्रमुख, वाहन विभाग

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (वाहन) यांचे कार्यालय.

for 19/1/19